भूमिका

## भूमिका

**सदर शोध निबंधाचा विषय आहे,**

चंद्रकुमार, नलगे यांच्या कादंबरी लेखनाचा अभ्यास 'देवाची साक्ष' आणि 'अगीनफूल' च्या आधारे करणे.

ही दोन पुस्तके संशोधनासाठी घेण्याचा उद्देश एवढाच की, त्या कादंबरीतील माणसे सारख्याच दर्जाची, त्यांची कष्ट करुन जीवन जगण्याची पध्दतीही सारखीच, सुडाची भावना, समस्या सारख्याच त्यामुळे हे दोन कादंबरी संग्रह मी निवडले आणि त्यांचा अभ्यास करुन या प्रबंधिकेत तो मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'देवाची साक्ष' हे 1979 सालचे पुस्तक आणि 'अगीनफूल' हे 1974 सालचे पुस्तक आहे. 1960 सालच्या पुस्तकापासून नलगे कथाकार व कादंबरीकार म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. त्यांनी आपल्या आसपासची माणसे, ग्रामीण समाज, त्यांच्या व्यक्तिरेखा कादंबरीच्या रुपाने रेखाटल्या, त्यातूनच त्यांच्या लेखनीत प्रगल्भता जाणवते, म्हणून मी माझ्या कुवतीप्रमाणे या दोन्ही कादंबरी लेखनाचा आणि व्यक्तींचा अभ्यास करता करता लेखकाच्या विकासाचाही आलेख पहाण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर अभ्यासातून ग्रामीण समाजाचे वास्तव स्वरुप मांडण्यात प्रा. नलगे यशस्वी झालेले आहेत हे स्पष्ट दिसून येते.

XXXXXXX